आसन क्रमांक १ ------------------------------

आसन क्रमांक २ (असल्यास) -----------------------   आसन क्रमांक ३ (असल्यास)-------------

# पुणे विद्यापीठ
## संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग
## प्रवेशपरीक्षा २०११ : सामाइक लेखी परीक्षा

**रविवार, २६ जून २०११** **वेळ** : तीन तास **एकूण गुण** : १००

---

**सूचना** : ही प्रश्नपत्रिका मराठीत आहे. प्रश्नांची उत्तरे मराठीतूनच लिहावी लागतील. आपण इंग्रजीतून उत्तरे लिहिणार असाल, तर इंग्रजी प्रश्नपत्रिका मागून घ्या. This is Marathi language version of the question paper. You will have to answer it in Marathi ONLY. If you wish to answer in English, ask for English version.

* या प्रश्नपत्रिकेचे दोन भाग आहेत. भाग १ ची प्रश्नपत्रिका प्रथम देण्यात येईल.
* भाग १ मधील प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत दिलेल्या कोऱ्या जागेत लिहावयाची आहेत.
* भाग १ पूर्ण केल्यावरच भाग २ ची प्रश्नपत्रिका देण्यात येईल.
* भाग १ ची प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एका तासाहून जास्त वेळ लावू नये, असा आपल्याला सल्ला आहे.

---

**भाग - १ (गुण ५०)**

**प्रश्न १) पुढीलपैकी कोणत्याही १५ प्रश्नांची उत्तरे लिहा.** (१५)

१) भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र-----------------------------------------------

२) सिटी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ------------------------------------------

३) ऑलिंपिक २०१२चे स्थळ ------------------------------------------------

४) ल्युमिए बंधूंना कशाचे श्रेय दिले जाते?-------------------------------------------

५) येमेनची राजधानी-----------------------------------------------------

---

**For office use only**

| Q. 1 (15) | Q. 2 (10) | Q. 3 (10) | Q. 4 (5) | Q. 5 (5) | Q. 6 (5) | Total (50) | Examiner's Signature |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

६) भूगोलाच्या परिभाषेनुसार 'गोबी' हे काय आहे?-------------------------------------------

७) होस्नी मुबारक यांची सत्ता कोणत्या देशात होती? -----------------------------------------

८) 'मृग नक्षत्राचा' कोणत्या नैसर्गिक घटनेशी संबंध जोडला जातो?------------------------------------

९) 'रवींद्र संगीता'चे जनक कोण?-------------------------------------------------

१०) महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या कोणत्या सभागृहात फक्त निर्वाचित सदस्य असतात?
-------------------------------------------------------------------------

११) पश्चिम बंगालमध्ये आत्ताच्या मुख्यमंत्र्यांच्या आधी कोण मुख्यमंत्रीपदी होते?----------------------------

१२) 'अँड्रॉइड' म्हणजे काय?------------------------------------------------------

१३) 'बालगंधर्व' या चित्रपटात त्यांची भूमिका कुणी केली आहे?-------------------------------------

१४) कावेरी नदी कोणत्या समुद्राला मिळते?-----------------------------------------------

१५) फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेतील २०११ सालची महिला एकेरीतील विजेती कोण?----------------------------

१६) टूजी घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष कोण आहेत?-------------------------

१७) 'बस्तर' हे काय आहे? ------------------------------------------------------

१८) अमृता प्रीतम, वि. स. खांडेकर, यू. आर्. अनंतमूर्ती, रवींद्र केळेकर यांच्यातील समान गोष्ट कोणती?

-------------------------------- -------------------------------------

१९) अमेरिकी अध्यक्षपदाचा कालावधी किती असतो? ------------------------------------------

२०) 'बिग बँग' सिद्धान्त कशासंबंधी आहे? ---------------------------------------------

**प्रश्नः २) भाषिक कौशल्ये** **(१०)**

**१)** पुढीलपैकी **कोणत्याही दोन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा. (२)

क) कानाडोळा करणे

----------------------- -----------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

ख) आकाशपाताळ एक करणे

----------------------- -----------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

ग) तोंडात बोटे घालणे

----------------------- -----------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

घ) दात कोरून पोट भरणे

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

**२)** पुढीलपैकी **कोणत्याही दोन** शब्दांसाठी **प्रत्येकी दोन** समानार्थी शब्द द्या. (२)

**क)** उच्छृंखल---------------------------------------------------------

**ख)** मूर्च्छा ----------------------------------------------------------

**ग)** निखालस -----------------------------------------------------------

घ) मतितार्थ ------------------------------------------------------------

३) पुढीलपैकी **कोणत्याही चार** शब्दांसाठी **प्रत्येकी एक** विरुद्धार्थी शब्द द्या. (२)

**क)** निंदा ---------------------- ----- **ख)** समर्थक----------------------

**ग)** आक्रमण -------------------------- **घ)** मर्त्य-------------------------

**च)** अजाण--------------------------- **छ)** भिन्न-------------------------

४) पुढील वाक्यांमध्ये शुद्धलेखन, व्याकरण व विरामचिन्हे यांच्या काही चुका आहेत. सर्व वाक्ये अचूक लिहून काढा व मूळ वाक्यांतील ज्या शब्दांमधील चूक दुरूस्त केली असेल अशा शब्दांखाली रेघ ओढा. शब्दांची भर घालू नका किंवा शब्द गाळूही नका, तर फक्त चुकीच्या शब्दांच्या / चिन्हांच्या जागी अचूक शब्द / चिन्ह लिहा. (४)

१) बहुदा तीचा काहीतरी गैर समज झाला असणार

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

२) आचानक ते धुड माझ्यासमोर उभे राहिले माझेतर हातपायच लटलाटयला लागले.

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

३) ती उद्गारली, काय सांगतेस तू आणि पोहणार

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

४) धावफलक असा भारत १९४ ७ श्रिलंका १९० ९

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

**प्रश्नः ३) पुढीलपैकी कोणतेही पाच कोण / काय आहेत व ते अलीकडच्या काळात बातम्यांमध्ये का होते ते सुमारे २० शब्दांत स्पष्ट करा. (१०)**

१) कनीमोळी

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

२) स्वामी अग्निवेश

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

३) डॉमिनिक स्ट्राऊस–कान

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

४) सिंधुताई सपकाळ

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

५) यशवंत सोनवणे

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

६) तहव्वूर राणा

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

७) पुट्टपार्थी

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

८) रामदेव बाबा

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

९) जयललिता

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

**प्रश्नः ४) पुढील जोड्या जुळवा. प्रश्नाखाली दिलेल्या जागेतील आकड्यांपुढे योग्य जोडीचे निदर्शक अक्षर लिहा. जोड्या दर्शवणाऱ्या रेघा ओढू नका. तशा रेघा ओढल्यास उत्तराला शून्य गुण देण्यात येतील.** (५)

| | |
|---|---|
| i) वॉल | a) नियतकालिक |
| ii) कॉपी रायटर | b) टीव्ही न्यूज चॅनल |
| iii) स्ट्रीमिंग | c) रियॅलिटी शो |
| iv) सबटायटल्स | d) वर्तमानपत्र |
| v) ब्रेकिंग न्यूज | e) चित्रपट |
| vi) संपादकांस (वाचकांची) पत्रे | f) जाहिरात |
| vii) फोन-इन कार्यक्रम | g) जनसंपर्क |
| viii) प्रसिद्धीपत्रक | h) फेसबुक |
| ix) सेलिब्रिटी परीक्षक | i) B§Q>aZoQ> |
| x) कव्हर स्टोरी | j) रेडिओ |

i) ---- ii) ---- iii) ---- iv) ---- v) ---- vi) ---- vii) ---- viii) ---- ix) ---- x) ----

**प्रश्न ५) पुढीलपैकी कोणत्याही पाच लघुरूपांचे पूर्ण रूप द्या.** (५)

***(सूचना** : ही उत्तरे तुम्ही देवनागरी किंवा रोमन लिपीत लिहू शकता किंवा लघुरूपांची मराठीतील प्रचलित रूपेही देऊ शकता. उदा. AIR- All India Radio, **किंवा** ऑल इंडिया रेडिओ **किंवा** आकाशवाणी)*

1. PMK
--------------------------------------------------------------------------------

2. TMC
--------------------------------------------------------------------------------

3. AIADMK
--------------------------------------------------------------------------------

4. IPC
--------------------------------------------------------------------------------

5. LIC
--------------------------------------------------------------------------------

6. NABARD
--------------------------------------------------------------------------------

7. IMF
--------------------------------------------------------------------------------

8. FICCI
--------------------------------------------------------------------------------

**प्रश्न ६) पुढीलपैकी कोणत्याही पाच पारिभाषिक शब्दांचे / संकल्पनांचे एका वाक्यात स्पष्टीकरण करा. (५)**

१) उदारीकरण

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२) ग्राहक किंमत निर्देशांक

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

३) भूस्थिर उपग्रह

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

४) एल् निनो

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

५) बायोमेट्रिक

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

६) अपलोड

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

७) पर्सेंटाइल

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

८) एफ्एस्आय्

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

**संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग, सामाइक लेखी परीक्षा २०११** **विभाग दोन**

**(गुण ५०)**

सूचनाः १) ही मराठी प्रश्नपत्रिका आहे. तुम्हाला प्रश्नांची उत्तरे फक्त मराठीतूनच लिहावी लागतील.
२) प्रत्येक प्रश्नापुढे दिलेल्या शब्दमर्यादेकडे विशेष लक्ष द्यावे.
३) व्याकरण व शुद्धलेखन यांकडेही लक्ष द्यावे.

---

**प्रश्न १)** खालीलपैकी **कोणत्याही एका** विषयावर पाचशे शब्दांचा निबंध लिहा. (२०)

१) नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकानंतरची राजकीय उलथापालथ
२) लीग- भारतीय क्रीडा क्षेत्रातील नवीन फॅड
३) अरब जगातील जनउद्रेक
४) माओवाद - अंतर्गत सुरक्षेला धोका की दडपलेल्या लोकांचा न्याय्य लढा?
५) भारतीय युवकांनी कुणाला आदर्श मानावे?
६) मराठी करमणूक उद्योगाची भरभराट

**प्रश्न २)** खालीलपैकी **कोणत्याही चार** विषयांवर प्रत्येकी शंभर शब्दांत टिपा लिहा. (२०)

१) जनलोकपाल विधेयक
२) तेलंगण वाद
३) ओबामा यांच्या राजवटीचे मूल्यमापन
४) व्याघ्र गणना
५) जैतापूर प्रकल्पाचा वाद
६) भारिप-सेना-भाजप आघाडी
७) मेरी कोम.
८) एम्.एफ्.हुसेन

**प्रश्न ३)** मेनस्ट्रीम या नियतकालिकाच्या २४ जून २०११ च्या अंकातील निर्माल्य विश्वास यांच्या लेखातील काही भाग पुढे दिला आहे. तो वाचून खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (१०)

भ्रष्टाचार हा दुर्दैवाने आपल्या जीवनाचा एक भाग झाला आहे हे नाकारता येणार नाही. असे असले तरी काही मोजके लोक वेगळी वाट चोखाळतात. भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवतात. ते जागल्याची म्हणजे व्हिसलब्लोअरची भूमिका पार पाडीत आहेत, तेच सतत धोक्याची घंटा वाजवत आहेत. भ्रष्टाचाराच्या विरोधात जागरुकता दाखवणारे हे लोक अधिक सजग व कुठल्या बाबतीत सहजासहजी हार मानणारे नसतात.

भ्रष्ट व्यक्तींना पकडणे हा काही तसा पोरखेळ नाही. (आपण तसे केले तर) आपला सूड घेतला जाईल किंवा वरिष्ठ अधिकारी आपली सगळी कारकीर्दच संपवतील, प्रसंगी जीव घेण्यासुद्धा मागेपुढे पाहणार नाहीत हे माहीत असतानाही जागल्याच्या रूपातील समाजाचे हे पहारेकरी मूक प्रेक्षक बनून राहू शकत नाहीत. जागल्यांच्या दृष्टीने भ्रष्टाचाराकडे कानाडोळा करणे हे प्रत्यक्ष भ्रष्टाचार करण्यापेक्षा वाईट आहे. जेव्हा त्यांना अशी चुकीची गोष्ट दिसते तेव्हा ते लगेच निषेध नोंदवतात. भ्रष्टाचाराला विरोध करणे ही त्यांच्यासाठी देशभक्तीची कसोटीच ठरते. एखादा गैरप्रकार माहीत असूनही तो जनतेसमोर उघड न करणे म्हणजे त्यांच्या दृष्टीने भ्रष्टाचाराला साथ देऊन त्यात सामील होण्यासारखेच असते. भ्रष्टाचाराच्या विरोधात उभे ठाकणे व त्याला आव्हान देणे याला फार मोठे धैर्य लागते. शोधक वृत्तीने काम करणाऱ्या

या जागल्यांना ते काही वेळा महागातही पडते. दुर्दैवाची गोष्ट अशी की भारतात भ्रष्टाचाराला वाचा फोडणे म्हणजे शिक्षेला निमंत्रण देणे. त्यासाठी बक्षीस मिळणे तर अशक्यप्राय.

जागल्यांच्या या भूमिकेला आता आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण मिळाले आहे. इ.स. २००३ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी भ्रष्टाचाराच्या विरोधात एक जाहीरनामा मंजूर केला. त्यावर १४० देशांनी स्वाक्षरी करून त्याला मान्यताही दिली आहे. या जाहीरनाम्याच्या कलम ३२ अन्वये जागल्यांना म्हणजे व्हिसलब्लोअर्सना संरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यानुसार अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड या देशात जागल्यांना संरक्षण देणारा कायदा अस्तित्वात आला आहे.

भारतात व्हिसलब्लोअर (जागल्या) संरक्षण विधेयक गेली अनेक वर्षे विचाराधीन आहे. २००१ मध्ये कायदा आयोगाने केलेल्या शिफारशींवर ते विधेयक आधारित असून त्यातील तरतुदी या इतर देशातील नियमांसारख्याच आहेत. या कायद्याचा कच्चा मसुदा तयार असून तो मांडण्यातही आला आहे. जागल्यांनी भ्रष्टाचाराला वाचा फोडल्यानंतर काहींचे हाल केले गेले, काहींना लक्ष्य करून त्रास देण्यात आला, तर काहींची हत्या करण्यात आली. अशा काही हृदयद्रावक घटनांच्या मालिकेमुळे हा कायदा आणला गेला. भारतीय राष्ट्रीय महामार्ग अधिकरणचे अभियंता मंजुनाथ षण्मुगम व इतर अनेक कार्यकर्त्यांची हत्या झाल्यानंतर देशाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले गेले आणि जागल्यांना संरक्षण देण्याची गरज पहिल्यांदा देशाला समजली. त्यासाठी सुयोग्य कायदा करण्यासाठी सरकारवर दबाव वाढू लागला. या विधेयकाचे नाव 'पब्लिक इंटरेस्ट डिस्क्लोजर अँड प्रोटेक्शन टू पर्सन्स मेकिंग द डिस्क्लोजर बिल २०१०' असे असून ९ ऑगस्ट २०१० रोजी ते केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केले आहे. संसदेत ते अजून मांडले जायचे आहे.

नवीन कायद्याचे परिणाम खूपच दूरगामी होणार आहेत. परंतु खरा प्रश्न हा आहे की, या कायद्यामुळे खरोखर जागल्यांचे, व्हिसलब्लोअर्सचे संरक्षण होऊ शकेल का? की, तो इतर कायद्यांसारखाच एक दिखाऊ कायदा ठरेल? या कायद्याच्या कक्षेत फक्त सरकारी अधिकारीच येतात. लष्कर आणि खाजगी उद्योगांतील भ्रष्टाचाराचा त्यात विचार केला जाणार नाही. भ्रष्ट राजकारण्यांना उघडे पाडणाऱ्यांबाबत त्यात काहीही तरतूद नाही. कायदा आयोगाने या विधेयकाच्या मूळ मसुद्यात निनावी तक्रारींची दखल घेण्याचे मान्य केले होते परंतु प्रस्तावित विधेयकात निनावी तक्रारींना परवानगी दिलेली नाही. केवळ भ्रष्टाचार उघड करणाऱ्यांची ओळख गुप्त ठेवण्यावर त्यात भर देण्यात आला आहे. त्याउलट भ्रष्टाचारविरोधी कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, दाखल झालेल्या तक्रारींची दखल घेऊन, तातडीने व पारदर्शक पद्धतीने चौकशी करून भ्रष्टाचारी व्यक्तींवर कारवाई करणे यावर विधेयकात भर देण्यात यावा. तसे झाले तरच तक्रार करणाऱ्यांना हल्ल्यांच्या धमक्या देणे, त्यांची व्यावसायिक छळवणूक करणे असे प्रकार होणार नाहीत.

मात्र जे लोक भ्रष्टाचाराच्या विरोधात सूड व धमक्यांना भीक न घालता लढतात ते कायदा अंमलबजावणी संस्थांकडून फारशा अपेक्षा ठेवत नाहीत. हे विधेयक त्यांना दिलासा देऊ शकेल का? भ्रष्टाचारी व्यक्तींवर खटले भरण्यासाठी पुरेशी माहिती उपलब्ध होईल का? देशात सध्या भ्रष्टाचारामुळे जी निषेधार्ह व दयनीय अवस्था आहे त्यात काही क्रांतीकारी बदल होईल का?

आशा करायला काय हरकत आहे?

---------

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

*(प्र. १ अनिवार्य आहे. प्र. २ ते ६मधील* **कोणत्याही चार** *प्रश्नांची उत्तरे द्या. शब्दमर्यादाः४०)*

१) वर दिलेल्या परिच्छेदासाठी दोन उचित मथळे द्या.

2) भ्रष्टाचाऱ्यांना पकडणे हा पोरखेळ नाही असे का महटले आहे?

3) निनावी तक्रारींची दखल घेतली जावी असे तुम्हाला वाटते काय? का?

4) कायदा अंमलबजावणी संस्थांकडून कार्यकर्ते फारशा अपेक्षा का ठेवत नाहीत?

5) वरील उताऱ्यात नमूद केलेल्या विधेयकाचे भवितव्य तुमच्या मते काय राहील?

6) जागल्याची (व्हीसलब्लोअरची) भूमिका पार पडणाऱ्या किमान दोन व्यक्तींची नावे सांगा व त्यांनी भ्रष्टाचाराची कोणती प्रकरणे उघडकीस आणली ते सांगा.

-------------